# स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळ (विशेषसंदर्भ—लहान राज्याची मागणी)

**डॉ. सौ. ममता व्ही. पाथ्रीकर,**
राज्यशास्त्र विभागप्रमूख, श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजा
**डॉ. मनिषा यादव**
राज्यशास्त्र विभागप्रमूख गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर,

........................................................................................

ब्रिटीश भारताता येण्यापूर्वी भारतीय राज्यव्यवस्था ही सरंजामशाही स्वरुपाची होती. भारताची शासनव्यवस्था छोटया,छोटया क्षेत्रामधे विभागलेली होती. ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्या चे स्वरुप एकात्म झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र भारतीयांच्या भाषिक, प्रादेशिक अस्मिता उफाळुन आल्यात आणि संविधानानूसार भाषावार प्रांतरचना करण्यात आली. राज्य केवळ भाषेच्या आधारावर टिकू शकत नाही, हे लहान राज्याच्या होत असलेल्या मागणीवरुण दिसून येते. लहान राज्यांची मागणी स्वातंत्र मिळाल्यापासून होत आहे. प्रशासनाच्या सोयीसाठी आणि आर्थिक विकासासाठी लहान राज्ये अधिक चांगली हा विचारप्रवाह जोर धरु लागला आहे. परंतू लहान राज्यांच्या मागणीने अखंड भारताची, राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना धोक्यात येऊ शकते हा प्रश्न या निमित्ताने उभा राहीला आहे.

**संशोधनाची उद्धिष्टे—**

- विदर्भ चळवळीचे अध्ययन करणे.
- लहान राज्याच्या निर्मिती संदर्भात स्वतंज्य विदभ राज्याच्या मागणी चे अध्ययन करणे.

ब्रिटिश काळात प्रशासनाच्या दृष्टीने देशाची प्रांतवार रचना केली होती ती स्वातंज्यानंतर तशीच राहीली नाही. त्यानंतर महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश इ. राज्याची निर्मिती प्रखर आंदोलनातून झाली होती स्वतंज्य राज्याचा मागण्या पाकीस्तान साररण्या राष्ट्राला अनुकूल होत्या म्हणून केंन्द्रसरकार स्वतंज्य राज्याची मागणी दुर्लक्षीत करीत असे. परंतू लहान राज्याच्या मागण्या कमी झाल्या नाहीत उलट त्या वाढतच गेल्या. १मे १९६० रोजी महाराष्ट्र निमैती च्या वेळी विदर्भाचा समावेश करण्यात आला. विदर्भाची एक वेगळी ओळख आहे. भौगेलीक,राजकीय,सांस्कुतीक,द्वस्ष्टीने या विभागाचे महत्व आहे.विदर्भासाठी आंदोलन उभे करण्याचा प्रयत्न स्व. ब्रीजलाल बियानी बापुजी अणे यांनी केला. तसेच श्रीहरी अणे,जांबुवंतराव धोटे तसेच श्रीनिवास खांदेवाले इ. करत आहेत.तेलंगणा राज्यनिर्मिती नंतर विदर्भ, बुंदेलखड, गोरखालंड, हरित प्रदेश या सारख्या लहान प्रदेशांची स्वंतज्य राज्याची मागणी राष्ट्रीय एकात्मतेचा भंग करणारी आहे. लहान राज्य करण्यामागे आर्थिक आणि राजकीय कारणे दिली जातात. राज्य आकाराने लहान असले तर विकास वेगाने होईल प्रशासन चांगले होईल हे जी अंशत: खरेअसले तरी अलीकडच्या काळात निर्माण झालेली लहान राज्यांची स्थिती उत्तराखंड, झारखंड, छत्तीसगड आपणाला माहिति आहेच. म्हणजेच छोटया राज्यांची निमैती झाल्यावर ही समस्या कमी होण्याऐवजी वाढल्या आहेत.

स्वतंज्य विदर्भ राज्याची मागणी करण्याआधी १९५३ मध्ये फाजल अली कमीशन ने स्वतंत्र विदर्भ राज्याची निकड दर्शवली होती. आज ही मागणी सर्वच राजकीय पक्षाचे नेते उचलून धरत आहेत भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष, कॉग्रेस पक्ष हे विदर्भातील नेते मंडळी स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करत आहेत. विकासाचे असंतूलन हा मूद्दा पूढे केला जात आहे. यातूनच राज्यविभाजनाचा प्रश्न आणि विदभमहाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल ही समस्या निर्माण झाली आहे.आजही विदर्भाचे मागासलेपण कायम आहे विदर्भाच्या पुर्वइतिहास पाहणे गरजेचे आहे. भाषावर प्रांतरचनेचे तत्वानुसार संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला असला तरी महाराष्ट्रातील विदर्भ हा प्रदेश एक स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात यावा ही आंकाक्षा पुर्वीपासूनच होती.

**स्वतंत्र विदर्भ चळवळ —** विदर्भ महाराष्ट्रात सामील करण्यासंदर्भात नागपूर करार आणि अकोला करार झाला होता. पुढे १९५६ मध्ये द्वैभाषिक राज्य स्थापन झाले त्यावेळी नागपूर

करारातीाल तरतूदींना घटनात्मक दर्जा दिला जावा असे निवेदन दिले. त्यानुसार घटनेत दुरुस्ती करुन उपकलम ३७१ ;२ नुसार राष्ट्रपती आपल्या आदेशाने पूढील प्रकारची कोणतीही विषेश जबाबदारी पार पाडण्यासाठी राज्यपालाना अधिकार प्रदान करु शकतील.

१ विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्यासाठी स्वतंज्य विकास मंडळाची स्थापना करणे अशा प्रत्येक मंडळांच्या कारभाराचा अहवाल दरवर्षी राज्य विधानमंडळास सादर करणे.

२ एक शासन म्हणून असणा.या राज्याच्या गरजांची मर्यादा साभाडुन या सर्व वेगवेगळया विभागांच्या विकासाठी समन्यायी प्रमाणात निधीची तरतूद करणे.

३ एक शासक म्हणून असणा.या राज्यांची गरजसाभाडुन यासर्व विभागासाठी उच्च तांत्रिक शिक्षण आणि नोक.यामध्ये पुरेशा संधी उपलब्ध होतील अशी समन्यायी व्यवस्था करणे.विदर्भ राज्य निर्मितसंदर्भात फाजल अली अहवालातील ठळक बाबींचा उल्लेख करावा लागतो.

४ महाविदर्भाचे चे नवीन राज्य स्थापन करावे. अकोला, अमरावती,बुलढाणा आणि यवतमाळ हे व.हाडचे चार जिल्हे आणि वर्धा, नागपूर, भंडारा, चांदा, हे चार असे एकुण आठ जिल्हयांचा विदर्भात समावेश करावा. अशी आयोगाने शिफारस केली. या अहवालामूळे स्वतंत्र विदर्भ मागणारे नेते आनंदात होते. राज्य पुर्नरचना आयोगाने स्वतंत्र विदर्भाची शिफारस केली होती किंवा एका भाषेची अनेक राज्य असावित. ही बाबासाहेबांची एकेकाळची सुचना होती.

द्वैभाषिक मुंबई राज्याची विभागणी करुन, महाराष्ट्र व गुजरात ही दोन नवीन राज्ये निर्मिती विधेयक विधीमंडळात सादर करतांना त्यावेळचे मुख्यमंत्री यंशवंतराव चव्हाण यांनी विदर्भाला निश्चित आश्वासन देणारे निवेदन केले ते म्हणतात '' आपले वैध हितसंबध जपले जाणर नाहीत अशी भीती विदर्भातील लोकांनी बाळगण्याचे कोणतेही कारण नाही असे आश्वासन देतो. किंबहुना त्यांच्या हितसंबधाचे आग्रहापूर्वक रक्षण केले जाईल. आणि त्यांची जपणूक हे भावी महाराष्ट्र सरकार आपले एक पवित्र कर्तव्य मानेल असे अभिवचन मी विदर्भातील लोकांना देतो. 'नागपूर करार' या नावाने ओळखत्या जाणा—या करारातील शर्तीचे पूर्णतया पालन केले जाईल. इतकेच नाही. तर शक्य असेल तेथे त्याहूनही अधिक झुकते माप त्यांच्या पदरात टाकले जाईल''.परंतु महाराष्ट्र शासनाने नागपूर कराराचे पालन केले नाही हीच दुर्लक्षीत बाब दांडेकर समितीने आपल्या अहवालात नमुद केली आहे. १९५६ मध्ये ७ व्या घटनादुरुस्ती नुसार काही राज्याचे पुर्नगठन करण्यात आले ज्यामध्ये महाराष्ट्रात विकास करण्यासाठी विभागवार विकास मंडळे स्थापन करण्यात आदेश मिळाले. संवैधानिक तरतूदीनुसार वैधानिक विकास मंडळे उशीराने स्थापन झालीत.

विकासासाठी लहान राज्य ही कल्पना योग्यच आहे मात्र विदर्भ, मराठवाडा च्या विकासासंदर्भात अहवाल सादर करणा.या दांडेकर समिती आणि केळकर समिती कमिती यांच्या अहवालाचे अध्ययनातून ही बाब समोर येते की दांडेकर समितीने केवळ सरकारी खर्चातील विभागवार असमतोल दुर व्हावा या संदर्भात शिफारस केली होती. तर केळकर समितीने विकासातील केवळ दरी मांडली परंतू ही दरी कशी दुर करावी हे सुचवले नाही. विकासाचा मापदंड केवळ सरकारी खर्च नाही तर त्या विभागातील भौगोलिक परिस्थिती, उद्योग, व्यवसाय, पायाभूत सुविधा, इतर संस्था, सोयीसुविधा बाबींचा स्वतंत्र विदर्भाची मागणी करतांना विचार व्हावा. संयुक्त महाराष्ट्र व्हावा या बाबतीत तत्कालीन राजकीय नेंत्यांचे जसे स्वप्न होते त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा कलश खचून आणला तद्वतच २००९ पर्यंत च्यामुख्यमंत्र्याचे नागपूर ड्रीम सिटी, नागपूरला सिंगापूर बनवू हे स्वप्न होते. आणि स्वप्न हे स्वप्नच असते.

विकास हा मुद्दा समोर ठेवून जर विदर्भ राज्याची स्वतंत्र होण्याची मागणी संयुक्तिक नाही असेच म्हणावे लागेल कारण राज्याचा विकास लहान राज्य, किंवा मोठे राज्य या निकषावर होत नाही किंवा कोणत्याही समित्या स्थापन करुन, समित्यांच्या शिफारशीने होत नाही फक्त राज्याच्या सर्व विभागा तील जे प्रकल्प कार्य हाती घेतले असेल ते पूर्ण करणे ही सत्तारुढ सरकारची जबाबदारी असावी केवळ निवडणूक जिंकण्यापुरती स्ववंत्र लहान राज्याची

मागणी हा मुद्‌दा नसावा. तेव्हाच प्रादेशिक असमतोल, अनेशेष नक्कीच दुर होण्यास मदत होईल यात शंका नाही

विदर्भाचे जे वैभव आहे. कापूस, वीजनीर्मिती, हे विदर्भात सर्वात जास्त आहे. सर्वात जास्त खनिज पदार्थ, काळी सुपीक जमीन विदर्भात, हे विदर्भ वैभव आहे. ही सामग्रीने विदर्भ संपत्ती विदर्भात आहे. नैसर्गिक साधन सामग्रीने विदर्भ सुपीक आहे परंतू उद्योगधंदयाची विकासप्रकल्पाची विदर्भात वाणवा आहे ही दुर करण्यासाठी शासनाने प्रयत्नशील असावे. शेतक—याला न्याय देणारे सहकारी तत्वावरील प्रकल्प उभारले जावेत सुदैवाने सध्या विदर्भाचे नेतृत्वाने जाहीरनाम्यावर लक्ष केन्द्रींत करुन विदर्भ विकासाचे, स्वतंत्र विदर्भाचे आश्वासन पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. विदर्भावील मंत्रीपदांची विशेषत: अर्थमंत्री, कृषीमत्री, उर्जामत्री यांनी सिंचन, कृषीविभाग, वीजनिर्मिती, शेतक—यांना २४ तास वीज कशी मिळेल यासाठी वीजनिर्मिती प्रकल्प उभारावेत, नांदगावपेठ येथील वस्त्रोद्योगाच्या साठी कच्या माल विदर्भातच उपलब्ध करुन द्यावा. अकोला, बुलढाणा विभागातील खारपाणपट्टा प्रकल्पग्रस्त या समस्या विचारात घ्यावात.

**सारांश**

स्वतंत्र विदर्भाची मागणी जवळजवळ एकशेदहा वर्ष जुनी आहे. विदर्भाचे न्याय प्रश्न मार्गी लावण्यासाठी ८ ऑगष्ट १९४६ ला आकोला करार आणि १४ मार्च १९६० चा नागपूर करार वैदर्भिय जनतेला न्याय देण्यासाठी होता. विदर्भाच्या भूमीत समाजवाद, गांधीवाद, हिदुंत्ववाद, नक्षलवाद सर्वच भूमीत विदर्भ ठाम आहे परंतू सिंचन, औदयोगिक विकास, रोजगारनिर्मिती कुपोषण, गरिबी, ग्रामीण, दुर्बल भाग दुर्लक्षित असल्याने आणि इतर विभागाच्या तुलनेत समन्यायी विकासात विदर्भाकडे दुर्लक्ष होत आहे म्हणून स्वतंत्र राज्याची मागणी केली जात आहे. परंतु विकासासंदर्भातील राजकीय नेत्यांची घोर अनास्था असल्याने स्वतंत्र राज्याच्या निर्मितीचे आंदोलन जोर धरत नाही.

राजकीय नेत्यांना राज्य हवे तर विदर्भातील जनतेला विकास हवा राज्यपुर्नचना चर्चेत सहभागी असलेले तत्कालीन अर्थमत्री सी.डी.देशमुख यांनी छोटी राज्ये होतील पण त्यांचा प्रपंच व्यवस्थित चालावा एवढी साधनसामग्री असणार नाही. त्यांचे विचार आजही महत्वपूर्ण आहेत. थोडक्यात विदर्भाचे न्याय प्रश्न निकाल लावले पाहीजेकृ

विकासासाठी लहान राज्य ही कल्पना योग्यच आहे मात्र विदर्भ, मराठवाडा च्या विकासासंदर्भात अहवाल सादर करणा.या दांडेकर समिती आणि केळकर समिती कमिती यांच्या अहवालाचे अध्ययनातून ही बाब समोर येते की दांडेकर समितीने केवळ सरकारी खर्चातील विभागवार असमतोल दुर व्हावा या संदर्भात शिफारस केली होती. तर केळकर समितीने विकासातील केवळ दरी मांडली परंतू ही दरी कशी दुर करावी हे सुचवले नाही.

**निर्ष्कष**

- लहान राज्ये आर्थिकदृष्टया सक्षम होऊ शकत नाहीत.
- त्यांना केन्द्राकडे मदतीसाठी अवलबुन रहावे लागते.
- लहान राज्यांनी आपला विकास केला हेकेवळएक दोन राज्याच्या उदाहरणातून दिसून येते
- स्वतंत्र राज्याची मागणी ही केवळ राजकीय हेतूने प्रेरित असते.
- नवीन राज्यांच्या निर्मिती मुळे नव्या पदांच्या,विशेषत: राज्यप्रमुख व तत्सम पदांच्या हव्यासासाठीच केवळ स्वार्थी भावनेतूनच स्ववंत्र राज्याची मागणी पुढे येत आहे असे निर्दशनास येते

**संदर्भ सुची:—**

१. महाराष्ट्राचे शासन व राजकारण—डॉ.एकनाथ खांदवे,आरती प्रकाशन,कर्जत
२. आधुनिक . महाराष्ट्राचे राजकारण,व्ही. एम. सीरशीकर, डायमंड प्रकाशन. पूणे
३.स्वतंत्र विदर्भाची चळवळ काल आणी आज — लोकसत्ता
४. महाराष्ट्र वार्षीकी — द युनिक ॲकेडमी,पुणे